# कोविड 19 च्या साथीचे शिक्षणक्षेत्रावरील परिणाम आणि भवितव्य

**डॉ. अनमोल शेंडे**

मराठी विभाग प्रमुख

गोविंदराव वारजुकर महाविद्यालय,

नागभीड, जि.चंद्रपूर

9404120409

shendeanmol@gmail.com

2020 या वर्षातील मार्चच्या शेवटचा आठवडा देशातील जनतेसाठी भय घेऊन प्रगट झाला. एक विषाणू देशभर आणि जगभर लोकांमध्ये अचानक भिती निर्माण करतो ही घटनाच आश्चर्यजनक स्वरूपाची होती. 2019 च्या नोव्हेंबर – डिसेंबरमध्ये चीनमध्ये नव्या भयंकर आजाराने डोके वर काढले आहे ही वार्ता अनेक देशांत वाऱ्यासारखी पसरली. चीनमधील वुहान शहरात कोरोनाचा पहिला रूग्ण आढळला. सुरूवातीला चीनने न्युमोनियासारख्या एका गुढ आजाराने आम्हाला घेरले आहे असे म्हटले तरी नंतर मात्र कोरोना आजाराचे खरे रूप जगाला सांगितले. हा इतका भयंकर आहे की, हळूहळू सारं जगच या आजाराने वेढले जाईल या कल्पनेने जागतिक आरोग्य संघटनेने याकडे जातीने लक्ष दिले. चीनच्या बाहेर या विषाणूचा पहिला रूग्ण 13 जानेवारीला थायलंड मध्ये सापडला आणि नंतर अनेक देश या कोरोना आजाराच्या तडाख्यात सापडले. वुहानहून केरळमध्ये परतलेल्या एका विद्यार्थ्याला कोरोनाने घेरले. ती भारतातील कोविड-19 ची पहिली केस. या केसनंतर भारत देशात हा आजार फार वेगाने पसरला.

जगाने आजवर अनेक साथीचे आजार बघितले. परंतु एवढा भयंकर आजार पहिल्यांदाच बघितला. प्लेगसारख्या अनेक आजाराने यापूर्वीही देशाला चिंतेत टाकले होते; परंतु हा आजार त्याहीपेक्षा घातक जाणवला. फार वेगाने या आजाराचा जनतेमध्ये संसर्ग होऊ लागला. त्यामुळे भारतासारख्या देशात एका दिवशी लाखाइतके रूग्ण पाहायला मिळाले. "2019 मध्ये आलेल्या कोरोना व्हायरसच्या एका प्रकारामुळे होणारा आजार म्हणून त्याचं नांव कोविड-19 (कोरोना व्हायरस डिसीज-19. विषाणूचं शास्त्रीय नांव -SARS-COV-2) असं ठेवलं गेलं. सार्स आणि मेर्स या दोन विषाणूंशी त्याचं साधर्म्य असल्याचंही सांगितलं गेलं. तेव्हाही या विषाणूचा संसर्ग एका व्यक्तीकडून दुसऱ्याकडे होत आहे हे लक्षात आलं नव्हतं."1परंतु नंतर मात्र या आजाराच्या संसर्गाचं स्वरूप निश्चित झालं. लोकं फार वेगाने रूग्णालयात भरती होऊ लागले. मरणाऱ्यांचं प्रमाणही दिवसाला लाखोच्या घरात जायला लागलं. या कोरोनाने भारतीय समाजातील अनेक क्षेत्र प्रभावित झाले. या आजाराचा फटका राजकारण, व्यावसायिकता, आर्थिक क्षेत्र, शिक्षण क्षेत्र, उद्योग, मजुर, कामगार अशा अनेक क्षेत्रांना बसला. आरोग्य सेवेत कार्यरत असणाऱ्या अनेक डॉक्टरांचाही या आजाराने बळी घेतला. यावरून या आजाराचे स्वरूप आपल्या लक्षात येते. या कोरोनाने श्रीमंत – गरीब असा भेद केला नाही. चांगला-वाईट असेही समिकरण या आजाराने जोडले नाही. जीवनाच्या अनेक क्षेत्रात वावरणाऱ्या अनेकांना या आजाराने पूर्णपणे घेरले. लाखो जीवांचा यात बळी गेला.

जीवनाच्या अनेक क्षेत्रावर अंतर्बाह्य प्रभाव टाकणाऱ्या शिक्षणक्षेत्रावरही कोरोनाने आघात केला. देशातील शाळा, महाविद्यालये बंद ठेवल्या गेली. ऑनलाईन शिकवणी सुरू झाली. या ऑनलाईन शिकवण्यामुळेही अनेक समस्या निर्माण झाल्या. ज्यांच्याकडे ॲन्ड्रॉईड मोबाईल आहे, असे विद्यार्थी ऑनलाईन वर्ग करू शकले. पण ज्यांच्याकडे ॲन्ड्रॉईड मोबाईल नाही असे विद्यार्थी मात्र ऑनलाईन वर्ग करू शकले नाही. त्यामुळे कोरोना काळात ॲन्ड्रॉईड मोबाईल नसणाऱ्या विद्यार्थ्यांचे मोठेच नुकसान झाले. यातून श्रीमंत आणि

गरीब असा भेद अधोरेखित झाला. प्रसारमाध्यमातून या विषयावर बरीच चर्चा झाली. कोरोनाने एक गोष्ट स्पष्ट केली ती अशी की, अजूनही ग्रामीण भागात इंटरनेट सेवा उपलब्ध नाही आणि देशातील अनेक लोकांकडे ॲन्ड्रॉईड मोबाईल नाही. महाविद्यालये बंद असल्यामुळे विद्यार्थ्यांना घरीच राहण्याशिवाय पर्याय नव्हता. ऑनलाईन वर्ग विद्यार्थी जरी करीत असत तरी त्यालाही मर्यादा होत्याच ! कारण जास्त प्रमाणात हे ऑनलाईन वर्ग केल्या गेले तर त्याचे दुष्परिणाम निर्माण होणे साहजिकच होते. त्यामुळे ऑनलाईन वर्ग किती करायचे याचा ताळेबंद मांडल्या गेला. ज्या विद्यार्थ्यांकडे ॲन्ड्रॉईड मोबाईल नव्हते अशा विद्यार्थ्यांमध्ये आपोआपच न्युनगंड निर्माण झाला. कारण ॲन्ड्रॉईड मोबाईल घेण्याची त्याची ऐपत नसल्यामुळेही एक नविनच आर्थिक नि मानसिक समस्या अनेक विद्यार्थ्यांसमोर निर्माण झाली. विद्यार्थी 24 तास घरीच बसून राहिल्यामुळे अनेक आरोग्यविषयक समस्या निर्माण झाल्याचे या काळात पहायला मिळाले.

प्राध्यापक हा शिक्षण व्यवस्थेतील अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. आजच्या तारखेला वरिष्ठ महाविद्यालयात शिकविणारे शेकडो प्राध्यापक आहेत ; जे अर्हता प्राप्त केले असूनही ते अस्थायी आहेत. अंशकालीन प्राध्यापक अशी त्यांना ओळख प्राप्त झाली आहे. प्राध्यापकांची शेकडो पदे रिक्त आहेत. परंतु ती भरल्या जात नाही. त्यामुळे एका बाजुला विद्यार्थ्यांचे नुकसान होते; तर दुसऱ्या बाजुने प्राध्यापकांच्या माथ्या वर बेरोजगार असा शिक्का येऊन पडतो. एम.ए., एम.फील., पीएच. डी., नेट, सेट असलेले आणि दहा-दहा वर्षे अंशकालीन प्राध्यापक म्हणून नोकरी करीत असलेले मोठ्या आशेने बघत आहेत ते शासन निर्णया कडे ! पदे भरण्याचा शासन निर्णय घेईल आणि प्राध्यापक म्हणून आपण कुठल्या तरी महाविद्यालयात रूजू होऊ ही त्यांची साधी अपेक्षा आहे. परंतु सरकार या स्थितीकडे अतिशय ढिम्मपणे पाहतांना दिसते. प्राध्यापकांची पदे न भरल्यामुळे शिक्षण व्यवस्थेचे किती नुकसान होत आहे हे खरे तर सरकारने जाणून घ्यायला पाहिजे. परंतु सरकार या स्थितीकडे गांभीर्याने पाहतांना दिसून येत नाही. "कोरोना संक्रमणामुळे राज्यातील वरिष्ठ महाविद्यालये 16 मार्च पासून बंद आहेत. त्यामुळे तासिका प्राध्यापकांच्या हाताला काम नाही. मार्च व एप्रिल महिन्याचे मानधनही त्यांना मिळालेले नाही. टाळेबंदीच्या काळात समाजातील विविध घटकांना विविध सवलती, आर्थिक मदत केंद्र राज्यशासनाने केली आहे. मात्र तासिका प्राध्यापकांना कुठलीही मदत मिळालेली नाही. त्यामुळे या प्राध्यापकांची प्रचंड कोंडी झालेली आहे."2 कोरोना पर्व सुरू झाल्याला आज 11 महिने झालेली आहेत. परंतु तासिका प्राध्यापकांना शासनाने मदत करणे तर सोडाच; त्यांना महाविद्यालयाने तासिका तत्त्वावर शिकविण्यास बोलाविले देखिल नाही. या मागचेही कारण आहे शासननिर्णय ! जोपर्यंत शासन निर्णय होत नाही; तोपर्यंत महाविद्यालयामध्ये तासिका तत्त्वावर शिकविण्यास प्राध्यापकांना बोलाविले जाणार नाही, असे महाविद्यालयीन प्रशासन स्पष्टपणे सांगते. या मागे महाविद्यालयीन प्रशासनाची काही चुक आहे असे म्हणता येत नाही. प्राध्यापकांची अशा स्थितीत काय अवस्था होत असेल हे या सरकारला न कळणे म्हणजे फार मोठी शोकांतिकाच म्हणावी लागेल.

नवनाथ गोरे या लेखकाला त्याच्या "फेसाटी" या कलाकृतीसाठी साहित्य अकादमी पुरस्कार मिळाला. या लेखकाला तासिका तत्त्वावर काम न मिळाल्यामुळे कोरोना काळात ते रोजंदारीचे काम करीत असत. साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त नवनाथ गोरेची ही अवस्था असेल तर इतरांचे काय हाल होत असावे ! अनेक अंशकालीन प्राध्यापकांनी कोरोना काळात भाजीपाला विकण्याचेही काम केले. ज्यांच्या हातून नवी पिढी घडणार आहे ते जर भाजीपाला विकत असतील किंवा रोजंदारीचे काम करीत असतील तर आपण कुठे चाललो आहोत याचा विचार करणे आवश्यक आहे. ज्यांच्या शब्दातून पिढी सशक्त होणार आहे ते शिक्षकच जर नोकरीसाठी वणवण भटकत असतील तर देशाच्या उज्ज्वल भवितव्याचे स्वप्न पाहायचे तरी कसे ? नवनाथ गोरेची कैफियत विश्वजीत कदम यांच्या कानी गेली आणि नवनाथ गोरे या लेखकाला नोकरी मिळाली. परंतु संवेदनशिलता बाळगून असणारे असे

विश्वजीत कदम यांच्यासारखे राजकारणी काही सगळयांच्या वाट्याला येत नाही. तासिका तत्त्वावर आयुष्याची गुजराण करणाऱ्या प्राध्यापकाचे आपण आज काय हाल करून ठेवले आहे. "शाळा, महाविद्यालयातील बहुसंख्य शिक्षकांची ही दयनीय व वंचित अवस्थाही माझ्या मते अर्धगुलाम आणि असंघटीत मजुरांपेक्षा वेगळी नाही. बहुसंख्य शिक्षक वेठबिगारासारखे किंवा सालदारासारखे काम करत असतांना त्यांच्या सेवा व्यवस्थेत सुधारणा न करणे, त्यावर चर्चाही न करणे, त्यावर उपाय न शोधणे, त्याकडे कानाडोळा करणे आणि सरकार व समाज यांनी आंधळेपणाने हे सारे स्विकारणे माझ्या मते फार मोठा गुन्हा आपण करत आहोत."3 विचारवंत-लेखक व शिक्षणतज्ज्ञ डॉ. सुधिर गव्हाणे यांचे हे मत या संदर्भात निश्चितच लक्षात घेण्यासारखे आहे.

कोरोनाने शिक्षण या पवित्र घटकाचे अधिकच केविलवाणी अवस्था केलेली आहे. शिक्षण व्यवस्थेत सकारात्मक बदल घडवायचे असतील आणि संपन्न भारताचे स्वप्न साकार करायचे असेल तर काळ कुठलाही असो त्या संदर्भात आपल्याला गांभीर्याने विचार करावाच लागतो. "सैन्य पोटावर चालते” असे नेपोलियन सारखा कसलेला युध्दनेता म्हणत असे. त्यामुळे प्राध्यापक सुखी असेल, आर्थिक दृष्ट्या तो संपन्न असेल तर अनेक चांगल्या गोष्टी तो करू शकेल. परंतु तो जर का उपाशी असेल तर त्याच्या कडून सकस निर्मितीची कशी अपेक्षा करणार ! देशभक्ती, देशाभिमान आणि शिक्षण विषयक धोरणात आमुलाग्र सुधारणा या गोष्टी बोलण्यासाठी ठिक आहेत ; परंतु जो पर्यंत आपण कृती करणार नाही, त्यासाठी कडक पाऊले उचलणार नाही तोपर्यंत नवे काहीच जन्माला येणार नाही. शिक्षण क्षेत्राचे अतोनात नुकसान करणाऱ्या कोरोना काळात तासिका तत्त्वावर कार्य करणाऱ्या प्राध्यापकांनाकाही सोयी - सवलती प्रदान करता आल्या असत्या. परंतु सरकारने या संवेदनशिल प्रकरणामध्येही इच्छाशक्ती दाखविली नाही. कोरोना आजाराची भिती दाखवून सरकारने अशी कृतीशिलता करण्यास हिंमत दाखविली नाही. परंतु आपल्या सोयीच्या गोष्टी करण्यास मात्र सरकार दोन पावले समोरचे राहीले. "मध्यप्रदेशमध्ये काँग्रेसचे सरकार पाडून भाजप सरकार स्थापन झाल्याचा जल्लोष सुरू होता. अयोध्येत मुख्यमंत्री आदित्यनाथ रामभक्तांना एकत्र करून रामलल्लाची पूजा करत होते. पण यातल्या कुणावर मुद्दाम कोरोना पसरवल्याचा तर सोडाच, काही चुक केल्याचा आरोपही झाला नाही, पण इथे मात्र...... पण हल्लीच्या वातावरणात वेगळं काही घडण्याची अपेक्षाच ठेवायचीच नाही कां ?"4 अंशकालीन प्राध्यापकांची एक कौटुंबिक सोय म्हणून देखील सरकार काही यंत्रणांना कामी लावू शकलं असतं पण सरकारकडून ही गोष्ट होऊ शकली नाही. आपल्या हिताची बरीच कामे सरकार कोरोना काळातही करत होतेच, परंतु शिक्षणक्षेत्रातील अनेक महत्तम घटकांकडे सरकार नावाच्या यंत्रणेने लक्ष दिले नाही.

कोरोना अजूनही सुरूच आहे आणि मुळातून तो संपेल हे निश्चितपणे आजतरी सांगता येत नाही. कोरोनाचे संकट लक्षात घेता सार्वजनिक ठिकाणी वावरतांना तोंडाला मास्क न लावणाऱ्या व्यक्तीस तीन वर्षांपर्यंत कारावासाची शिक्षा देणारा कायदा कतार या आखाती देशाने केला आहे. भारताने किंवा महाराष्ट्राने असा कडक कायदा केला नसला तरी काही सौम्य कायदे केले आहेतच. मुद्दा हा आहे की, कोरोनावर मात करण्यासाठी औषध बाजारात आलेले आहे. तरी देखील आपल्याला काळजी घ्यावीच लागणार आहे. प्रसंगानुरूप तोंडाला मास्क लावावेच लागेल. कोरोनाने आपल्या देशात अनेक घटकांना उध्वस्त केले. पुढील काळात कोणता आजार येईल आणि मानव जातीच्या विनाशासाठी तो किती गंभीर रूप धारण करेल हे आपल्याला छाती ठोकपणे सांगता येणार नाही. प्रश्न एवढाच आहे की, कालखंड कितीही विपरीत असो सरकारी यंत्रणेने शिक्षणव्यवस्थेकडे, त्यात वावरणाऱ्या छोट्या छोट्या घटकांकडे कर्तव्य समजून लक्ष पुरविणे आवश्यक आहे. अन्यथा महासत्ता बनू पाहणाऱ्या देशाचे भविष्य पुढील काळात दैदिप्यमान असेल अशी कल्पना आपण कदापी करू शकणारनाही.

**संदर्भ ग्रंथ :**

1. गौरी कानेटकर, जग थांबतं तेव्हा, समकालीन प्रकाशन, पुणे, 2020, पृ. 21
2. दैनिक लोकसत्ता, विदर्भ आवृत्ती, 7 नोव्हें. 2020, पृ. 1
3. दैनिक पुण्यनगरी, नागपूर आवृत्ती, प्रवाह पुरवणी, 30 एप्रिल 2017, पृ. 3
4. उनि, जग थांबतं तेव्हा, पृ. 63